# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*



# डॉ. सोपानराव चव्हाण यांनी अनेक पिढ्यांच्या उध्दाराचे अलौकिक कार्य केले : डॉ. साळुंखे

▲ **पाटण**, दि. १९ : कोयना एज्युकेशन सोसायटीमुळे अतिदुर्गम, डोंगरदऱ्यात विखुरलेल्या तालुक्यात जिथे शिक्षण नाही तेथील तळा-गाळातील सर्वसामान्य बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविण्याचे कार्य झाले. ज्यांच्या कपाळी निरक्षरतेचा कलंक होता त्यांच्या कपाळी प्रगतीचा टिळा लावण्याचे पवित्र कार्य करणाऱ्या डॉ. सोपानराव चव्हाण यांनी शिक्षणाच्या माध्यमातून अनेक पिढ्यांचा उद्धार करण्याचे अलौकीक कार्य केले असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या डॉ. सोपानराव चव्हाण यांचा ९० वा वाढदिवस अभिष्टचिंतन व प्रा. डी. डी. चव्हाण यांनी लिहिलेल्या ज्ञानतपस्वी डॉ. सोपानराव चव्हाण चरित्रग्रंथाचे प्रकाशन सोहळा अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटनमंत्री विक्रमसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संस्थेचे संचालक डॉ. प्रल्हाद चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, दादासाहेब जाधव, कवयित्री सौ. मीरा चव्हाण, डी. डी. चव्हाण तसेच चव्हाण कुटुंबियांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, माणूस उच्च शिक्षित झाला की तो आपल्या गावाला विसरतो, पण डॉ. सोपानराव चव्हाण यांनी उच्च शिक्षण घेवूनही आपल्या गावाला न विसरता त्यांनी गावाकडील सर्वसामान्य माणसाशी संपर्क ठेवला. शिस्त, संयम आणि सातत्याने काम करण्याची वृत्ती, आचरणातील शालिनता, बोलण्या, वागण्यातील नम्रता या गुणांनी शिक्षण व्यवस्थेत परिवर्तनवादी कार्य करणाऱ्या डॉ. सोपानराव चव्हाण यांचे कार्य अलौकिक असल्याचे सांगितले. माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, डॉ. सोपानराव चव्हाण यांनी मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने केले. संस्थेचे काम करताना शहरात मिळणारे शिक्षण माझ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तालुक्यात कसे मिळेल याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले.



मार्गदर्शन करताना डॉ. माणिकराव साळुंखे, व्यासपीठावर विक्रमसिंह पाटणकर, डॉ. सोपानराव चव्हाण, अमरसिंह पाटणकर, डॉ. प्रल्हाद चव्हाण व मान्यवर.

त्याग आणि संघर्षाशिवाय मोठेपण मिळत नाही. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या प्रगतीसाठी काकांनी घेतलेले कष्ट, केलेला संघर्ष आणि त्याग महत्त्वाचा असून माणसाजवळ विधायक कामाची दृष्टी असेल तर स्वप्रयत्नांती तो समाज परिवर्तन घडवून विकासाची दृष्टी निर्माण करू शकतो ते काम डॉ. सोपानराव चव्हाण यांनी केले असल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना डॉ. सोपानराव चव्हाण म्हणाले, आनंद मागून मिळत नाही तो मिळवावा लागतो. काम करताना आपल्या जवळ येणाऱ्या सर्वांना मदत करा. कामात आनंद असतो तो मिळवा. पेन-सील हातात धरताना लटपटणारे हात जेव्हा हुबेहुब शिक्षकांच्या अक्षरांची नक्कल करतात ते आपले प्रशस्तीपत्रक असते. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून झालेले शैक्षणिक कार्य आणि संस्थेच्या प्रगतीमध्ये माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि योगदान असल्याचे सांगून संस्थेच्या वाटचालीतील अनेक घटनांचा तसेच प्रसंगाना उजाळा दिला.

संस्थेचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी काकांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा घेताना काकांच्या कार्यांचा गौरव करून या वयातही तरुणांना लाजवेल अशा उत्साही काकांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी चरित्रग्रंथाचे लेखक डी. डी. चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

संजय इंगवले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विनायक राऊत व दिनकर माथणे यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे संचालक संजीव चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमास तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षणप्रेमी नागरिक, शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते.